MHGA040000992020

दाखल तारीख : ०३.०२.२०२०
नोंदणी तारीख : ०३.०२.२०२०
निकाल तारीख : ०३.०६.२०२६
कालावधी : ०६वर्ष, ०४म.,००दि.

| | |
|---|---|
| | **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आरमोरी, जि. गडचिरोली यांचे न्यायालय**<br>**(पिठासीन अधिकारी श्रीमती वैशाली व्ही. चौधरी)**<br>**(न्यायनिर्णयाची तारीख :०३/०६/२०२६)**<br>**नि.फौ.मा.क्र.०६/२०२०** |
| | अपराध क्र. :३१३/२०१८<br>पोलीस स्टेशन : आरमोरी |
| **तक्रारदार** | महाराष्ट्र शासन मार्फत<br>पोलीस स्टेशन, आरमोरी |
| **आरोपी क्र.१**<br><br><br><br>**आरोपी क्र.२** | **सोनु उर्फ विजय रामकृष्ण कुर्वे,**<br>वय २८ वर्षे, व्यवसाय मजुरी,<br>राह. वडधा, ता. आरमोरी, जि. गडचिरोली<br><br>**ज्ञानेश्वर गजानन शेडमाके,**<br>वय २७ वर्षे, व्यवसाय मजुरी,<br>राह. डार्ली, ता. आरमोरी, जि. गडचिरोली |

**आदेश नि.क्र.१ वर**
**(दिनांक ०३ जुन, २०२६ रोजी घोषित)**

प्रस्तुत प्रकरण फरार आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिताचे कलम ३७९ सहकलम ३४ अन्वये दंडनीय अपराधांकरीता दाखल झालेले आहे.

२. प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी प्रफुल रामदास भैसारे याने त्याचे मावस भावाकडुन दुचाकी शाईन होंडा क्र.एम.एच.३४-ए.डी.६३४५ ही रु.१६,०००/- ला विकत घेतली होती. दि.२९.११.२०१८ रोजी त्याची बहिण प्रिती टेंभुर्णे हिला भेटण्याकरीता गेला व त्याचे बहिणीने त्याला मटण घेण्यास सांगितले असता तो सायंकाळी ५.०० वाजता मौजा वडधा येथे पोहचला असता तेथील लाकडे याचे हॉटेल जवळ मोटारसायकल स्टॅन्डला लावुन मटण दुकानातुन मटण घेऊन आला असता त्याची मोटारसायकल ठेवलेल्या ठिकाणी मिळुन आली नाही. त्यानंतर फिर्यादीने आजुबाजुला शोध घेतला मिळुन आली नाही.

त्यानंतर फिर्यादीने वडधा गावातील लोकांना विचारपुस केली असता लोकांनी सांगितले की, आरोपी हे सदर मोटारसायकल घेऊन जाताना दिसले. त्यामुळे फिर्यादी हा आरोपीच्या घरी गेला परंतु आरोपी हे घरी हजर नव्हते. त्यामुळे फिर्यादीने पोलीस स्टेशन, आरमोरी येथे आरोपी विरुध्द फिर्याद दिली.

४. प्रस्तुत प्रकरणातील आरोपी फरार असल्यामुळे त्याच्या विरुध्द कलम २९९ फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये दोषारापपत्र दाखल करण्यात आले. आरोपींविरुध्द वांरवार समन्स, वारंट काढुन देखील ते तामिल करण्यात पोलीस अपयशी ठरले. आरोपींस फरार घोषित करुन फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २९९ प्रमाणे पुरावे नोंदविण्याचा आदेश पारित करण्यात आला.

५. अभियोग पक्षाने एका साक्षीदारांचा साक्षपुरावा नोंदविली. राजेंद्र येवले (सा.क्र.१) हा पंच साक्षीदार आहे. त्याने त्याचे साक्ष पुराव्यात सांगितले की, दि.०२.१२.२०१८ रोजी पोलीसांनी पंचनामा करण्याकामी बोलाविले नव्हते. साक्षीदाराला पंचनामा दाखविण्यात आल्यावर त्याने त्यावरील असलेली सही त्याची असल्याचे मान्य केले. परंतु त्यातील मजकुर नाकारला आहे. त्याने अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. त्यामुळे सहा. सरकारी वकीलांनी त्याचा उलटतपास घेतला असता नकाराशिवाय काहीही आले नाही.

७. प्रकरणातील इतर साक्षीदारांना वारंवार समन्स काढण्यात आले. परंतु अभियोग पक्ष त्यांची उपस्थिती संपादित करु शकले नाही. प्रकरण ६ वर्षे जुने असल्याकारणाने अभियोग पक्षास पुरेशी संधी दिल्यानंतर अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

८. वरील उपलब्ध पुराव्यांचे अवलोकन केले असता आरोपी विरुध्द सबळ पुरावा आढळुन आलेला नाही. आरोपीने फिर्यादीची मोटारसायकल चोरुन नेली असे वरील साक्षीदाराने सांगितले नाही. अभियोग पक्ष फिर्यादी व तपासी अंमलदार यांना सुध्दा न्यायालयात हजर करु शकले नाही. त्यामुळे आरोपीवरील फिर्याद व गुन्हा सिद्ध झालेला नाही. तसेच आरोपींविरुध्द वारंवार समन्स, वारंट काढण्यात आले परंतु अभियोग पक्ष त्यांना सुध्दा हजर करण्यास अपयशी ठरले आहे. आरोपी विरुध्द सबळ

पुरावा उपलब्ध नसल्यामुळे ते आरोपमुक्त होण्यास पात्र आहे. त्यामुळे पुढील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आ दे श

१. आरोपी क्र.१ **सोनु उर्फ विजय रामकृष्ण कुर्वे,** आरोपी क्र.२ **ज्ञानेश्वर गजानन शेडमाके** यांना सदर प्रकरणातुन आरोपमुक्त करण्यात येते.

२. आरोपी विरुध्द काढण्यात आलेले गैरजमानती वारंट परत बोलविण्यात येते.

३. सदर प्रकरण बंद करण्यात येते.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by VAISHALI VIKAS CHOUDHARI
Date: 2026.06.03 17:37:28 +0530

स्थळ : आरमोरी                    (श्रीमती व्ही.व्ही. चौधरी)
दिनांकः०३.०६.२०२६                न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, आरमोरी.